संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# एकीकडे मदत आणि दुसरीकडे फसगत

रिझर्व्ह बँकेने आपल्या रेपो दरात १८ टक्के वाढ केली. इतर काही निर्णय घेतले. सध्या महागाईने हैराण असलेल्या सामान्य माणसाला दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून रेपो दरात केली गेलेली वाढ कितपत प्रत्यक्षात उपयोगी पडेल हे येणाऱ्या काळातच पाहायला मिळू शकते. तसाच प्रकार सहकारी बँकांविषयी घेतलेल्या निर्णयांबाबत म्हणता येईल. साधारणपणे दर तीन महिन्यांनी रेपो दरामध्ये केले जाणारे बदल देशाच्या अर्थकारणावर परिणाम करीत असतात. मात्र यावेळी प्रथमच सहकारी बँकांविषयी एक महत्त्वाचा निर्णय घेतला गेला तो म्हणजे राष्ट्रीयकृत किंवा खासगी बँकांप्रमाणे आता सहकारी नागरी किंवा ग्रामीण बँकांना घरांसाठी शंभर टक्के पतपुरवठा करता येणार आहे. आतापर्यंत शहरी भागातील बँकांना घरासाठी कर्ज देताना सत्तर लाख रुपयांची मर्यादा होती. तर ग्रामीण भागात घर खरेदी करण्यासाठी तीस लाख रुपयांपर्यंतच कर्ज दिले जात होते. आता या कर्जमर्यादेत शंभर टक्के वाढ केली गेली आहे. सध्याच्या मर्यादेच्या दुप्पट कर्ज नागरी सहकारी बँका आपल्या ग्राहकांना देऊ शकतील. खासगी बँकांना कर्ज देण्याबाबत अशी कोणतीच मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचा व्यवसाय चांगला फोफावू शकला आणि त्या चांगला फायदाही मिळवू शकल्या. अगदी ठिकठिकाणच्या जिल्हा सहकारी बँकांनासुद्धा असे जास्त मर्यादेचे कर्ज देता येत नव्हते. ही कर्जमर्यादा वाढल्यामुळे सामान्य ग्राहकांचा लाभ होईल. त्यांना कर्ज मिळवणे सोपे जाईल. आणि बँकांचाही व्यवसाय वाढेल, असे उद्दिष्ट ठेवले गेले आहे. स्वाभाविकपणे या निर्णयाचे राज्यातील गृहनिर्माण संस्थांनी किंवा राज्य हौसिंग फेडरेशन्सनी स्वागत केले आहे. मात्र एकीकडे असा निर्णय घेतला जात असताना दुसरीकडे रेपो दरातल्या वाढीमुळे हेच गृहकर्ज महागणार आहे. म्हणजेच गृहकर्जासाठी ज्यादा व्याज मोजावे लागणार आहे. म्हणजे एका हाताने मदत करायची आणि दुसरीकडून मात्र फसगत व्हायची. अशी काहीशी संभ्रमाची परिस्थिती सामान्य ग्राहकांची आणि नागरी बँकांचीही होऊ शकते.

### सहकारी बँकांना लाभ

या निर्णयाचे महत्व एवढ्यासाठी म्हणता येईल की २०११ साली सहकारी बँकांच्या किंवा जिल्हा बँकांच्या घरकर्जावर मर्यादा घातली गेली होती. म्हणजे तब्बल अकरा वर्षांनी ती उठवली गेली आहे. ज्यावेळेला हे बंधन घातले गेले त्यावेळेला बँकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार डोळ्यासमोर ठेवला गेला होता. शिवाय गैरकारभार होण्याची शक्यता लक्षात घेऊन सामान्य माणसाच्या पैशाची लूट होऊ नये. किंवा सहकारी बँकांना पैशांची अफरातफर करता येऊ नये हा त्यामागचा उद्देश होता. प्रत्यक्षात तो किती प्रमाणात साध्य झाला हेदेखील तपासले गेले पाहिजे. कारण मुळातच गृहकर्जाला मर्यादा घातली जात असताना नागरी सहकारी बँकांकडून इतर उद्योग धंद्यांना भरमसाठ कर्ज देण्याची मुभा कायम ठेवली गेली होती. आणि मग सामान्य वैयक्तिक पातळीवरचा किंवा खरोखरच निवाऱ्याची गरज असलेला ग्राहक या सुविधेपासून वंचित राहिला. पण मोठमोठे बिल्डर्स वेगवेगळ्या कंपन्या स्थापून याच सहकारी बँकांकडून कोट्यवधीची कर्जे घेऊ लागले. अगदी ज्या राजकारण्यांच्या हातात अनेक सहकारी बँका असतात त्यांनीदेखील आपल्या हितसंबंधियांना भरमसाठ कर्ज दिले. आणि नंतर ही कर्जे परत केली नाहीत. ज्यामध्ये अनेक बँका दिवाळखोर झाल्या. पंजाब, महाराष्ट्र बँकेचे उदाहरण डोळ्यासमोर आहे. ज्यामध्ये एका बड्या हौसिंग कंपनीलाच हजारो कोटींचे कर्ज देण्याचा प्रकार घडला आणि सामान्य माणसाच्या ठेवी परत करायलाही या बँकेकडे पैसे उरले नव्हते. म्हणजेच गृहकर्जावरची ही मर्यादा वस्तुस्थितीला धरून नव्हती असाच त्याचा निष्कर्ष निघतो. आतादेखील ही मर्यादा काढताना खरोखरीच सामान्य माणसाचे हित जपायचे आहे का हितसंबंधियांची सोय साधायची आहे. असा स्वाभाविकपणे प्रश्न निर्माण होतो. कोरोनानंतर घरबांधणी क्षेत्र डबघाईला आले. अजूनही ते पूर्ण उभारी घेऊ शकलेले नाही. कदाचित या नव्या निर्णयामुळे घरबांधणी क्षेत्रालाही हातभार लावण्याचा सरकारचा विचार असू शकतो.

### व्याजदराचे काय?

प्रश्न एवढाच आहे की आज जरी ही मर्यादा वाढवली गेली असली तरी त्या तुलनेत घरांच्या किमतीदेखील अव्वाच्या सव्वा वाढलेल्या आहेत. म्हणजे अगदी अकरा वर्षांपूर्वी असलेल्या घरांच्या किमती आणि आताच्या किमती यामध्ये निश्चितच दोनशे टक्के वाढ झालेली पाहायला मिळते. मुंबईसारख्या महानगरात एक कोटीच्या खाली वन रुम किचनचा फ्लॅटही येऊ शकत नाही. त्या व्यवसायातला हा फरक लक्षात घेण्यासारखाच ठरतो. याशिवाय आज गृहकर्जात शंभर टक्के वाढ देण्याचा उदारपणा रिझर्व्ह बँकेने दाखवला असला तरी व्याजदराचे काय. कारण खासगी बँकांचे व्याजदर राष्ट्रीयकृत बँकांच्या व्याजदरापेक्षा जास्त आहे. एवढेच नव्हे तर खासगी बँकांपेक्षा सहकारी बँकांच्या गृहकर्जाचे व्याजदरसुध्दा दीड दोन टक्क्यांनी जास्त आहे. म्हणजे कर्जमर्यादा जरी वाढवली असली तरी व्याजदराबाबत रिझर्व्ह बँकेचे कुठलेच नियंत्रण नसेल तर ही मर्यादा वाढूनही सामान्य ग्राहकाचा फार काही लाभ होईल असे काही म्हणता येत नाही. फक्त रिझर्व्ह बँकेच्या या नव्या धोरणाचा सहकारी बँकांना निश्चितच लाभ उठवता येऊ शकतो आणि इतर बँकांबरोबर स्पर्धा करून आपला व्यवसाय वाढवता येऊ शकतो. ही मर्यादा वाढवत असतानाच गृहकर्जासाठी दिल्या जाणाऱ्या मुदतीतसुध्दा वाढ करणे अपेक्षित आहे. सहकारी बँका या जास्तीत जास्त पाच ते सात वर्षे मुदतीचे कर्ज देत होत्या. खासगी बँका मात्र वीस वर्षांच्या मुदतीत कर्ज उपलब्ध करून देतात हा फरक लक्षात घेतला तर सहकारी बँकांनाही या स्पर्धात्मक बाबीचा विचार करावा लागेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११


**संकटे कधीही एकटी येत नाहीत. सोबत उपायसुद्धा घेऊन येतात. फक्त गरज असते ,संयम ठेवून उपाय शोधण्याची.**

## पंचांग

**शुक्रवार १० जून, २०२२**
**शक १९४४ शुभकृत्नामसंवत्सर**

**ज्येष्ठ शुक्ल दशमी/एकादशी * नक्षत्र : चित्रा**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- ९-१४**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १६-०६ कन्या**
**१६-०७ ते २४-०० तूळ**

**निर्जला स्मार्त एकादशी, गायत्री जयंती; जागतिक दृष्टिदान दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



# गार्लिक चिकन



★ **साहित्य** :- १ किलो चिकन, १ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, ३ ते ४ लसूणचे कांदे, ४०० ग्रॅम दही, चिकन मसाला, गरम मसाला, हळद, कसूरी मेथी, काश्मिरी मिर्च पावडर चवीनुसार मीठ.

★ **कृती** : प्रथम चिकनला मीठ चोळून स्वच्छ धुवून घ्या. लसूण बारीक चिरून घ्या. एका भांड्यात चिकन घेऊन त्याला ४०० ग्रॅम दही, एक चमचा तेल, मीठ, बारीक चिरलेला लसूण, हळद, १ चमचा काश्मिरी मिर्च पावडर लावून ३ ते ४ तास मेरिनेट करण्यास ठेवावे. नंतर एका पसरट कढईमध्ये तेल तापवून त्यात मेरिनेटेड चिकन घालावे व मध्यम आचेवर झाकण ठेवून शिजवावे. गॅसवरून उतरवण्याच्या १० मिनिटे अगोदर त्यात कसूरी मेथी, बारीक चिरलेली कोथिंबीर, १ चमचा काश्मिरी मिर्च पावडर, चिकन मसाला, गरम मसाला टाकून झाकण काढून ग्रेव्ही थोडी घट्ट होऊ द्या. चिकनच्या तुकड्यांना स्पर्श न करता चमच्याने ग्रेव्ही थोडी ढवळा व गॅस बंद करा.



# राहुलची माघार! टीम इंडियासाठी मोठे संकट टी-२० मालिकेत सलामीची समस्या बिकट

**भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेला कालपासून सुरुवात झाली आहे. मात्र या मालिकेतून कर्णधार के. एल. राहुल याने दुखापतीमुळे माघार घेतल्याने काही समस्या निर्माण झाल्या आहेत.पहिली समस्या म्हणजे नेतृत्वाची! के. एल. राहुल हा टीम इंडियाचे नेतृत्व करताना भलेही फारसा यशस्वी ठरलेला नसला तरी तो एक अनुभवी खेळाडू आहे आणि वृषभ पंत पेक्षा निश्चितच उजवा आहे.**







■ मुंबई

**त्याच** बरोबर फलंदाजी करताना तो संयम राखून फलंदाजी करतो. कुठे बचावात्मक पवित्रा घ्यायचा आणि कुठे आक्रमकता दाखवायची याचे राहुलला चांगले ज्ञान होते. शिवाय यंदाच्या आयपीएलमध्ये त्याने लखनौ संघाचे नेतृत्व करताना संघाला उपांत्य फेरीपर्यंत नेले.

या उलट श्रेयस अय्यारच्या पश्चात दिल्ली संघाचे नेतृत्व करणारा ऋषभ पंत यंदा आयपीएलमध्ये फारसा प्रभाव पाडू शकला नाही. मागील आयपीएलच्या तुलनेत यावेळी दिल्ली कॅपिटल संघाची कामगिरी अत्यंत सुमार होती आणि याला कारणीभूत होता अर्थातच कर्णधार ऋषभ पंत! त्याच्या नेतृत्वाखाली खेळणारा दिल्ली संघ गुणतालिकेत खूपच खाली घसरला होता आणि अशा ऋषभ पंतकडे यावेळी टी-२० मालिकेचे नेतृत्व देण्यात आले आहे. म्हणूनच चिंता वाटतेय. पंत हा आक्रमक फलंदाज असला तरी त्याच्याकडे संयम नाही. त्यामुळे संघ अडचणीत असताना सुधा पंतने अनेक वेळा बेजबाबदारपणे फलंदाजी केली आहे आणि त्याचे परिणाम टीम इंडियाला भोगावे लागले आहेत. या मालिकेतसुद्धा तसे घडू शकते पंतपेक्षा हार्दिक पंड्या चांगला कर्णधार आहे. त्याने यंदाच्या आयपीएल हंगामात आपल्या संघाला विजेतेपद मिळवून देताना अनेक सामन्यात आपल्या नेतृत्व गुणांची चमक दाखवली आहे. त्यामुळे हार्दिक पंड्या याच्याकडे जर नेतृत्व असते तर निश्चितपणे भारतीय संघाने ही मालिका जिंकली असती; पण आता मात्र पंतच्या नेतृत्वात या मालिकेत टीम इंडियाला किती यश मिळेल त्याचबरोबर राहुल नसल्याने सलामीचा प्रश्न कसा सोडवणार याबाबत चिंता आहे. भारताकडे ऋतुराज गायकवाड याच्यासारखा सलामीचा फलंदाज आहे; पण तो राहुल इतका सक्षम नाही. त्यामुळे सलामीचा प्रश्न कठीण बनला आहे.

# गेमकेचा पराभव करून लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत

■ जकार्ता

**इंडोनेशिया** मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनने डेन्मार्कच्या रासमास गेमके याचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्याची लढत टीएन चेन याच्याशी होणार आहे. चेनने थोमास कप स्पर्धेत लक्ष्यला पराभूत केले आहे.

इंडोनेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत पीव्ही सिंधू आणि लक्ष्य सेन यांच्याकडून भारताला मोठ्या अपेक्षा आहेत. आज लक्ष्य सेन याने जागतिक क्रमवारीत १३ व्या स्थानावर असलेल्या गेमके याला २१-१८,२१-१५,असे पराभूत केले.

या दोन खेळाडूंमध्ये पहिलीच लढत होती. सेन पहिल्या गेम मध्ये ०-३ असा मागे पढला होता. पण नंतर मात्र त्याने आक्रमक खेळ करीत ९-६ अशी आघाडी घेतली. पण ब्रेक पर्यंत गेमके याला ११-१० अशी छोटी आघाडी मिळाली. पण ब्रेक नंतर लाक्ष्यने लागोपाठ ६ गुण घेतले. आणि १६-१२ अशी आघाडी आघाडी घेतली आणि त्यानंतर आरामात २१- १८ असा सेट जिंकला पुढच्या सेट मधेही लक्ष्यचाच वरचष्मा राहिला आणि अशा तर्हेने लक्ष्यने गेमके याला पराभूत करून उपांत्यपूर्व फेरी गाठली आता चेन च्या विरोधात त्याची कसोटी लागणार आहे मात्र पुढचा सामनाही आपण जिंकू असाविश्वास त्याने व्यक्त केला आहे.

# एएफसी फुटबॉल स्पर्धेत भारत विजयी

■ कोलकाता

**आशिया** कप क्वालिफिकेशन फुटबॉल स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत भारताने कंबोडियाचा २-० असा पराभव केला. कर्णधार सुनील क्षेत्री याने केलेल्या दोन गोलमुळेच भारताला कंबोडियावर विजय मिळवता आला. आपला १२७ वा आंतरराष्ट्रीय सामना खेळणाऱ्या क्षेत्री याने त्याच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्याच्या कारकिर्दीत आतापर्यंत ८२ गोल केलेले आहेत.

भारत विरुद्ध कंबोडिया यांच्यातील फुटबॉल सामन्यात जबरदस्त चुरस बघायला मिळाली. कर्णधार क्षेत्री याने १४ व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टीवर पहिला गोल करून भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर बरोबरी साधण्यासाठी कंबोडियाच्या खेळाडूंनी जोरदार संघर्ष केला; पण भारतीय खेळाडूंनी त्यांना गोल पोस्टपर्यंत पोहोचू दिले नाही. त्यानंतर ६६ व्या मिनिटाला क्षेत्रीने मैदानी गोल करून २-० अशी आघाडी वाढवली. ही आघाडी अखेर पर्यंत कायम राहिली आणि भारताने कंबोडियावर २-० असा विजय मिळवला. आशिया कप फुटबॉल टूर्नामेंट २०२३ किंवा २०२४ च्या सुरुवातीला होणार आहे मात्र भारतीय फुटबॉल संघाची या स्पर्धेसाठी चांगली तयारी झालेली आहे.

# सिंधू इंडोनेशिया ओपनच्या दुसऱ्या फेरीत

■ जकार्ता

**इंडोनेशिया** ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताची स्टार खेळाडू पीव्ही सिंधू हिने आपल्या पहिल्या फेरीचा सामना जिंकून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. मात्र पहिल्या फेरीत प्रतिस्पध्र्याने तिला कडवी लढत दिली.

इंडोनेशिया सुपर मास्टर ५०० टूर्नामेन्ट स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पीव्ही सिंधू हिला डेन्मार्कच्या लीन क्रिस्तोफर्सचे कडवे आव्हान होते. मात्र ५१ मिनिटांच्या लढतीत सिंधूने लीनचा १८-२१,२१-१५,२१-११ असा पराभव केला. विशेष म्हणजे पहिला गेम सिंधूने गमावला होता. तर दुसऱ्या गेममधेही लिनने आघाडी घेतली होती. पण नंतर मात्र सिंधूने आपला अनुभव पणाला लावून पुढचे दोन दोन गेम जिंकले आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. आता दुसऱ्या फेरीत इंडोनेशियाच्या ग्रेगोरीया मारीस्का हिच्याशी तिचा सामना होणार आहे. दरम्यान भारताच्या कश्यपला मात्र पराभवाचा धक्का बसला आहे.



## फॉर्म जी - स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण

(नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

संबंधित तपशील

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | शॅरॉन बायो-मेडिसिन लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १९.०६.१९८९ |
| ३. | प्राधिकरण, ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | L24110MH1989PLC052251 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोचा नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | डब्ल्यू-३४ ३४/१ एमआयडीसी तळोजा, रायगड, महाराष्ट्र-४१०२०८ कॉर्पोरेट पत्ताः प्लॉट क्र. १९, ६०१, प्रोक्झिमा (अरुणाचल भवन), सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००७०५. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोची दिवाळखोरी सुरू झाल्याचा दिनांक | सीआयआरपी दि. ११.०४.२०१७ रोजी आला आणि माननीय एनसीएलटीद्वारे आदेश ०३.०६.२०२२ नुसार पुन्हा सुरू करण्यात आला. |
| ७. | स्वारस्य अभिव्यक्तीच्या आमंत्रणाचा दिनांक | १०.०६.२०२२ |
| ८. | कोड च्या कलम २५ (२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्धतेचे ठिकाण : | तपशीलवार ईओआय आणि पात्रता निकष कॉर्पोरेट ऋणकोच्या वेबसाईट https://www.sharonbio.com येथे उपलब्ध |
| ९. | कलम २९ ए अन्वये लागू अपात्रता निकष उपलब्धतेचे ठिकाण : | तपशील https://www.sharonbio.com येथे उपलब्ध |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त करण्याचा अंतिम दिनांक | ०४.०७.२०२२ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ०९.०७.२०२२ |
| १२. | तात्पुरत्या यादीस आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १४.०७.२०२२ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २४.०७.२०२२ |
| १४. | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १४.०७.२०२२ |
| १५. | ठराव योजना, मुल्यांकन नमुना, माहिती निवेदनपत्रिका आणि अधिक माहिती मिळविण्याकरिता विनंतीची पद्धत | ठराव व्यावसायिक ठराव योजनेकरिता विनंती, मुल्यांकन नमुना, माहिती निवेदनपत्रिका आणि अधिक माहिती ठराव व्यावसायिक/कॉर्पोरेट ऋणकोसोबत गोपनियता करार केल्यानंतर संभाव्य ठराव अर्जदारासह इलेक्ट्रॉनिक मेल किंवा व्हर्च्युअल डाटा रूम (सूचित केले जाऊ शकते) द्वारे सामायिक करतील. तसेच, संभाव्य ठराव अर्जदाराचा प्रक्रियेमध्ये सहभाग हा स्वारस्य अभिव्यक्तीकरिता तपशिलवार आमंत्रणामध्ये नमूद केलेल्या, किमान पात्रता निकष पूर्ण करणे, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये पात्रता आणि संकेत आणि त्याअंतर्गत विनियमनाअन्वये निर्दिष्ट लागू आवश्यकता समाविष्ट असलेल्या शर्तींचे समाधान करण्याच्या अधीन आहे. |
| १६. | ठराव योजना सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३.०८.२०२२ |
| १७. | ठराव व्यावसायिकाकडे ठराव योजना सादर करण्याची पद्धत | तपशील वरील मुद्दा १५ मध्ये नमूद ठराव योजनेकरिता विनंतीच्या भागामध्ये |
| १८. | निवाडा प्राधिकरणाकडे मंजुरीकरिता ठराव योजना सादर करण्याचा अंदाजित दिनांक | १२.०९.२०२२ |
| १९. | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. पुलकित गुप्ता, अंतरिम ठराव व्यावसायिक नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P-02364/2021-2022/13697 |
| २०. | ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता आणि ईमेल, मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार | श्री. पुलकित गुप्ता, अंतरिम ठराव व्यावसायिक नोंदणीकृत कार्यालयः एच-६६ए, गेट क्र. ४, साकेत, मालविया नगर, नवी दिल्ली, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, ११००१७. नोंदणीकृत ईमेल आयडीः pulkit.gupta@in.ey.com |
| २१. | ठराव व्यावसायिकासोबत पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालयः प्लॉट क्र. १९, ६०१, प्रॉक्झिमा (अरुणाचल भवन), सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०५ ईमेल आयडीः ip.sbml@in.ey.com |
| २२. | अधिक तपशील मिळण्याचे ठिकाण | श्री. पुलकित गुप्ता, अंतरिम ठराव व्यावसायिक कार्यालयः प्लॉट क्र. १९, ६०१, प्रॉक्झिमा (अरुणाचल भवन), सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०५ ईमेल आयडीः ip.sbml@in.ey.com |
| २३. | फॉर्म जी प्रसिद्धीचा दिनांक | १०.०६.२०२२ |

टीप १: कृपया नोंद घ्यावी की, शॅरॉन बायो-मेडिसिन लिमिटेड (एसबीएमएल) ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया ("सीआयआरपी") माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा, मुंबई ("माननीय एनसीएलटी") यांनी पीटर बेक ॲण्ड पार्टनर व्हर्मोएगेन्सव्हरवाल्टुंग लि. आणि मे. कलरॉस अपॉर्च्युनिटीज यांनी नादारी आणि दिवाळकोरी संकेत, २०१६ ("आयबीसी") च्या कलम ७ अन्वये दाखल केलेल्या सी.पी. क्र. २४६/आयॲण्डबीपी/एनसीएलटी/एमएएच/२०१७ धारण केलेल्या कंपनी याचिकेमध्ये ("कंपनी याचिका") पारित त्यांच्या आदेशानुसार दि. ११.०४.२०१७ रोजी दाखल करून घेण्यात आली. आयबीसी अन्वये विहीत कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्यानंतर, कॉर्पोरेट ऋणकोकरिता पीटर बेक ॲण्ड पार्टनर व्हर्मोएगेन्सव्हरवाल्टुंग लि. ("ठराव अर्जदार") यांनी दाखल केलेली ठराव योजना धनको समितीच्या सदस्यांनी मंजूर केली आणि त्यानंतर माननीय एनसीएलटी द्वारे मंजूर करण्यात आली.
तथापि, ठराव व्यावसायिकांनी मंजूर ठराव योजनेच्या शर्तींचे उल्लंघन केले आणि माननीय एनसीएलटीद्वारे पारित ठराव योजनेची अंमलबजावणी केली नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी याचिका क्र. १३०५-१३०६/२०२२ मधील दिनांक २८.०२.२०२२ रोजीच्या त्यांच्या आदेशानुसार कॉर्पोरेट ऋणकोची नवीन सीआयआरपी सुरू करण्याचे आणि त्याच्या पुढे, कायद्यानुसार सर्व आनुषंगिक कृती करण्याचे स्वातंत्र दिले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाद्वारे पारित आदेशानुसार, ईओआय आमंत्रित करण्याकरिता; इच्छुक संभाव्य ठराव अर्जदारांकडून ठराव योजना आमंत्रित करणे; अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून निम्नस्वाक्षरीकारांची नियुक्ती करणे आणि कॉर्पोरेट ऋणकोच्या ठराव प्रक्रियेच्या पूर्ततेकरिता सर्व आवश्यक कारवाई करणे याकरिता १०५ दिवस मंजूर करण्याकरिता भारतीय स्टेट बँकेने कंपनी याचिकेमध्ये आयए क्र. १०६२/२०२२ धारण केलेला अर्ज आणि कॉर्पोरेट ऋणकोच्या सर्व देणेकऱ्यांच्या वतीने अतिरिक्त प्रतिज्ञापत्र ("देणेकऱ्यांचा अर्ज") माननीय एनसीएलटी समक्ष दाखल केला. माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठ-१ यांनी त्याच्या दिनांक ०३.०६.२०२२ रोजीच्या आदेशानुसार उपरोल्लेखित देणेकऱ्यांच्या अर्जास मान्यता दिली आणि निम्नस्वाक्षरीकारांना अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून नियुक्त केले.
टीप २: वरील निर्दिष्ट वेळापत्रकामध्ये धनको समिती त्यांच्या संपूर्ण आणि निःसंशय अधिकारामध्ये, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये विहीत एकूणच वेळापत्रकाच्या अधीन राहून, सुधारणा करू शकतात. वेळापत्रकामधील अशा कोणत्याही सुधारणांचा तपशील संभाव्य ठराव अर्जदारांना योग्यरित्या सूचित करण्यात येईल. कॉर्पोरेट ऋणकोच्या सीआयआरपीच्या इतिहाससंबंध तपशीलवार पार्श्वभूमीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट https://www.sharonbio.com येथे उपलब्ध सदर फॉर्म-जीसह प्रसिद्ध झालेल्या ईओआयकरिता तपशीलवार आमंत्रणाचा संदर्भ घ्यावा.
सही/-
अंतरिम ठराव व्यावसायिकाची स्वाक्षरी
श्री. पुलकित गुप्ता, अंतरिम ठराव व्यावसायिक
अंतरिम ठराव व्यावसायिकाचा नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02364/2021-2022/13697
अंतरिम ठराव व्यावसायिकाचा नोंदणीकृत पत्ता : एच-६६ए, गेट क्र. ४, साकेत, मालविया नगर, नवी दिल्ली, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, ११००१७.
शॅरॉन बायो-मेडिसिन लिमिटेडकरिता
दिनांकः १० जून, २०२२
ठिकाणः मुंबई

## पश्चिम रेल्वे

### दुरुस्ती आणि रंगकाम

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्लूए), पश्चिम रेल्वे, ६वा मजला, अभि. विभा., मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ खाली दिलेल्या तपशीलानुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा सूचना क्र. व दिनांक | कार्य आणि स्थळ | कामाचे अंदाजित मूल्य रु. | इसठे रु. |
|---|---|---|---|---|
| १ | BCT/22-23/39 dt.08.06.2022 | झोन ८-ए :- विरार-जोरावसान सेक्शन :- विरार (वगळून) आणि उमरगाव (समाविष्ट) दरम्यान किमी ६०.७६ ते किमी १४५.१३० दरम्यान एसएसई/डहाणू रोडच्या अधिकारितेमध्ये सर्वसाधारण दुरूस्ती आण रंगकाम, व्हाईट वॉशींग, कलर वॉशींग, डिस्टेम्परींग, पॉलिशींग इत्यादी. | ५४,८०,७५१.३१ | १,०९,६०० |
| २ | BCT/22-23/40 dt.08.06.2022 | झोन ९-ए :- विरार-जोरावसान सेक्शन :- वलसाड येथील लोको शेड, सी ॲण्ड डब्ल्यू डेपो समाविष्ट उमरगाव (वगळून) आणि जोरावसान (समाविष्ट) दरम्यान किमी १४५.१३० ते किमी २१२ दरम्यान एसएसई/वलसाडच्या अधिकारितेमध्ये सर्वसाधारण दुरूस्ती आण रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशींग इत्यादी. | १,६७,५१,०३९.२८ | २,३३,८०० |
| ३ | BCT/22-23/41 dt.08.06.2022 | झोन ८-बी :- एडीईएन/डीआरडीच्या सेक्शनमधील अर्थात किमी ६०.७६ ते किमी १४५.१३ पर्यंतच्या पुलांसाठी सर्वसाधारण दुरूस्ती आण रंगकाम इत्यादी. | ७७,८९,३३४.१० | १,५५,८०० |
| ४ | BCT/22-23/42 dt.08.06.2022 | झोन ९-बी :- एडीईएन/बीएलच्या सेक्शनमधील अर्थात किमी १४५ ते किमी २१२ पर्यंतच्या पुलांसाठी सर्वसाधारण दुरूस्ती आणि रंगकाम इत्यादी. | ७९,७०,१३४.१० | १,५९,४०० |

**सादर करण्याची तारीख व वेळ :** अ. क्र. १ ते २ करता ०५.०७.२०२२ रोजी १५.०० वा. पर्यंत आणि अ. क्र. ३ ते ४ करता ०८.०७.२०२२ रोजी १५.०० वा. पर्यंत.
**उघडण्याची तारीख व वेळ :** अ. क्र. १ ते २ करता ०५.०७.२०२२ रोजी १५.३० वा. पर्यंत आणि अ. क्र. ३ ते ४ करता ०८.०७.२०२२ रोजी १५.३० वा. पर्यंत.
निविदा अटींच्या संदर्भात, कृपया www.ireps.gov.in वर भेट द्या. मनुष्यकृत प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly 0154